रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३५२ वा • शुक्रवार, ता. ११ जुलै २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## मेहेराबादमध्ये मौन शताब्दी महोत्सव हजारो मेहेरप्रेमींनी पाळले मौन





अहमदनगर । प्रतिनिधी

अवतार मेहेरबाबांनी १० जुलै १९२५ रोजी मौन स्वीकारले होते. त्या घटनेच्या शंभराव्या वर्षानिमित्त यंदाचा मौन दिन मौन शताब्दी म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त नगरजवळील मेहेराबादमध्ये तीन दिवसांचा शताब्दी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. जगभरातील हजारो मेहेरप्रेमींनी या निमित्त २४ तास मौन पाळून श्रद्धांजली वाहिली.दौंड रोडवरील मेहेरबाबा टेकडीवरील समाधी स्थळ आणि लोअर मेहेराबादमधील बाबांनी मौन सुरु केलेली ऐतिहासिक झोपडी भाविकांसाठी खुली करण्यात आली. या दोन्ही ठिकाणी दर्शनासाठी दिवसभर रांगा लागल्या होत्या. भाविक मौन पाळून खाणाखुणांनी संवाद साधत होते.मौन शताब्दी निमित्ताने भारतासह अनेक देशांतील मेहेरप्रेमी मेहेराबादला आले होते. समाधी परिसरात टाचणी पडली तरी आवाज ऐकू येईल इतकी शांतता पसरलेली होती. हजारो भाविक शांतपणे बसून मौनात सहभागी झाले होते.मेहेरबाबांनी तीन वेळा मौन स्वीकारले होते, मात्र १० जुलै १९२५ रोजी त्यांनी घेतलेले मौन आयुष्यभर पाळले. ते ४४ वर्षे म्हणजे ३१ जानेवारी १९६९ रोजी शरीर ठेवलेपर्यंत एकही शब्द बोलले नाहीत. त्यावेळी संवादासाठी त्यांनी एबीसीडी बोर्ड वापरला होता, जसा आज आपण संगणक वा मोबाईलचा वापर करतो.

## गुरुपौर्णिमेनिमित्त भगवानगडावर भक्तांचा महापूर



पाथर्डी । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायातील एक महत्त्वाचे अध्यात्मिक केंद्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या भगवानगडावर गुरुपौर्णिमेनिमित्त हजारो भक्तांनी गर्दी केली होती. आपल्या गुरूचे दर्शन व पूजन करण्यासाठी राज्यभरातून आलेल्या भाविकांनी संपूर्ण गड भक्तिरसात न्हालून टाकला. गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येपासूनच भाविक संत भगवान बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी भगवानगडावर दाखल झाले होते. यावेळी गडाचे मठाधिपती ह.भ.प. न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे गुरूपूजन गडावरील प्रधान आचार्य हभप नारायण स्वामी व शिष्यगणांनी केले. भाविकांनी देखील त्यांच्या दर्शनाचा लाभ घेतला.दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरला गेलेली भगवानगडाची पालखी गुरुपौर्णिमेला पुन्हा गडावर परतल्यावर ''काल्याचा'' सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. यंदा हा सोहळा गुरुपौर्णिमेच्या दिवशीच झाल्यामुळे दुग्धशर्करा योग जुळून आला. आज सकाळी डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधान आचार्य हभप नारायण महाराज शास्त्री यांनी विजयी श्री पांडुरंगाचा अभिषेक केला. त्यानंतर संत भगवान बाबा व संत भीमसिंह महाराज यांच्या समाधीचे अभिषेक व महापूजन करण्यात आले. यानंतर हजारो भक्तांनी डॉ. शास्त्री महाराज यांचे पुष्पहार अर्पण करून गुरूपूजन केले. कार्यक्रमास शिरूर कासार येथील सिद्धेश्वर संस्थानचे मठाधिपती हभप विवेकानंद महाराज शास्त्री, गडाचे उत्तराधिकारी हभप कृष्णा महाराज शास्त्री, राजा हरिश्चंद्र संस्थानचे हभप भगवान महाराज राजपूत, भालगावचे मच्छिंद्रनाथ संस्थानचे हभप नवनाथ महाराज शास्त्री, मिडसांगवीचे सालसिद्ध बाबा संस्थानचे हभप हनुमंत महाराज शास्त्री, तागडगावचे भगवान बाबा संस्थानचे हभप अतुल महाराज शास्त्री, एकनाथवाडीचे निरंजन संस्थानचे हभप संतोष महाराज गीते व भिलवडे येथील संस्थानचे गणेश महाराज बडे यांच्यासह गडाचे शेकडो विद्यार्थी व हजारो भाविकांची उपस्थिती होती. भाविकांच्या वतीने सर्वांना महाप्रसाद देण्यात आला. संपूर्ण दिवसभर गुरूंच्या दर्शनासाठी भक्तांची रीघ लागलेली होती. गडाचा संपूर्ण परिसर 'श्री गुरु चरणकमलभ्यां नमः'च्या गजरात भक्तिरसात न्हाल्याचे दृश्य या दिवशी पाहायला मिळाले.

## दावल मालिक जत्रेस सुरुवात



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

गदेवाडी, गावातील लोकश्रद्धेचा केंद्रबिंदू असलेल्या हजरत दावल मालिक बाबा यांच्या उरुस-जत्रा उत्सवास ता. १० रोजीपासून मंगल सुरुवात झाली आहे. सर्व धर्मीयांची श्रद्धास्थान असलेल्या दावल मालिक बाबा मंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. गावातील वातावरण भक्तिमय झालं असून, गंगा-जमूनी संस्कृतीचे दर्शन घडवणारा हा उत्सव अनेक वर्षांपासून गावकऱ्यांच्या सहभागाने पारंपरिक पद्धतीने साजरा होतो. यामध्ये विविध धार्मिक विधी, उरूस सोहळा, लंगर (महाप्रसाद), तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचाही समावेश असतो. आजपासून सात ते आठ दिवस हा उत्सव चालणार आहे. जत्रेच्या सुरळीत आयोजनासाठी ग्रामपंचायत, पोलीस प्रशासन व स्वयंसेवकांची तयारी पूर्ण असून, परिसरात योग्य सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

## सुजाता इंटरनॅशनल स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

**सोनई । प्रतिनिधी**

वात्सल्य प्रतिष्ठान संचलित सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, सोनई येथे ता. १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमा म्हणजेच महर्षी व्यास पौर्णिमा मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक किरण सोनवणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून हभप युवा कीर्तनकार शिवप्रसाद पंडित यांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर किरण सोनवणे यांनी प्रमुख पाहुण्यांचे संत पूजन करून त्यांचा सत्कार केला.विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना आपले आई-वडील व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली व गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.किरण सोनवणे सरांनी आपल्या मनोगतातून गुरू व पालकांविषयी असणाऱ्या आदराचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.मुख्याध्यापिकाज्योती सोनवणे यांनी गुरुपौर्णिमेच्या परंपरेविषयी माहिती दिली. सहाय्यक शिक्षिका तनपुरेमॅडम यांनी गुरु-शिष्य नात्याविषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी व्यासमुनी, ऋषीमुनी, भगवान श्रीराम, श्रीकृष्ण, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, संत तुकाराम आदींच्या वेशभूषा साकारून गुरु-शिष्य परंपरेवर आधारित देखावे सादर केले.प्रमुख पाहुणे शिवप्रसाद महाराज यांनी आपल्या मनोगतात, आई-वडील हेच पहिले गुरु असल्याचे सांगून, संस्कार गर्भातच होत असतात, असे विचार मांडले. तसेच गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व पटवून देत थोर संत, महापुरुषांच्या उदाहरणांद्वारे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाची सांगता ''पसायदान'' सादर करून झाली. या कार्यक्रमाचे नियोजन सहाय्यक शिक्षक सोमनाथ तुपे यांनी केले. सूत्रसंचालन संदीप चौधरी,तर आभार प्रदर्शन सचिन चांडे यांनी केले.संपूर्ण कार्यक्रमात सर्व शिक्षकवृंदांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## शेतात, ग्रामपंचायतीत आणि शिल्पकलेच्या सर्जनशील दुनियेत विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट

संगमनेर । नितीनचंद्र भालेराव

रोज शाळेत बसून पुस्तकांतील अभ्यासक्रम केवळ वाचण्यातून विद्यार्थी अनेकदा कंटाळतात. पण जर शिक्षण निसर्गाच्या सान्निध्यात आणि अनुभवातून दिलं, तर तो ज्ञानाचा खरा अर्थ समजतो. इनोव्हेटर्स पब्लिक स्कूल, चंदनापुरी, यांनी अशाच अनुभवाधारित शिक्षणाचा भाग म्हणून इयत्ता ६ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी धांदरफळ खुर्द येथे क्षेत्रभेट सहलीचे आयोजन केले होते. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी थेट शेतात जाऊन कोबी लागवडीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. लिंबाची बाग, नारळाची उंच झाडे यांसारखी दृश्ये त्यांनी पुस्तकात वाचली होतीच, पण प्रत्यक्ष बघताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची झळक होती. विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय आणि तलाठी कार्यालयालाही भेट देत प्रशासनातील कामकाजाची माहिती मिळवली. गावातील पायाभूत सुविधा, शिक्षण, लोकसंख्या रचना, जमिनीचे वर्गीकरण, नोकरीच्या संधी, सेंद्रिय शेती आणि स्थानिक व्यवसाय याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. या वेळी गावाचे सरपंच, सदस्य, तलाठी, सेवा सोसायटीचे चेअरमन इत्यादी मान्यवर विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शनासाठी उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गावातील पारंपरिक मूर्तिकला व्यवसाय समजून घेण्यासाठी वाकचौरे यांच्या कारखान्याला भेट दिली.गणपती मूर्ती, माठ, रांजण, चूल, देवीच्या मूर्ती, पणत्या, किल्ले, तुळशी वृंदावन यांसारख्या विविध मातीच्या वस्तूंचे सजीव शिल्प बघतांना विद्यार्थ्यांची



उत्सुकता वाढली. शिल्पकार वाकचौरे यांनी या कलाकृतींमागील कल्पकता, कौशल्य व सर्जनशीलतेबद्दल सविस्तर माहिती दिली. यानंतर विद्यार्थ्यांनी प्रगतशील शेतकरी खताळ यांच्या शेताला भेट दिली. येथे त्यांनी शेतीतील आधुनिक पद्धती, सेंद्रिय व रासायनिक शेतीतील फरक, उत्पादनातील अडचणी, भांडवली गुंतवणूक, मजूर व पाणी व्यवस्थापन, खते-औषधांचा वापर यांसारख्या महत्त्वाच्या बाबी समजून घेतल्या. या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ सैद्धांतिक ज्ञान नव्हे, तर अनुभवातून शिकण्याचा आत्मविश्वास वाढला. त्यांच्या मनात भारतीय ग्रामीण संस्कृती, शेती व पारंपरिक व्यवसायांबद्दल आदर निर्माण झाला. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये नवीन जिज्ञासा, उत्साह आणि चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले. प्रात्यक्षिक शिक्षणातून उभ्या राहत असलेल्या या पिढीला समाजाशी नातं जोडण्याचा आणि भविष्यकाळात सुजाण नागरिक म्हणून घडण्याचा मार्ग मोकळा करणाऱ्या अशा उपक्रमांचे खरोखरच कौतुक करावे तेवढे थोडेच!

## फुले, शाहू, आंबेडकर, कर्मवीर आधुनिक गुरू- बोडखे

श्रीगोंदा । प्रतिनिधी

''फुले, शाहू, आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील हे आधुनिक भारतातील खरे गुरू आहेत,'' असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांनी केले. ते श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.बोडखे पुढे म्हणाले, ''ज्या काळात शिक्षणाचा प्रसार नव्हता, त्या काळात बहुजन समाजासाठी रयत शिक्षण संस्था उभारून तिचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रभर पसरविणारे कर्मवीर भाऊराव पाटील खऱ्या अर्थाने शिक्षणगुरू ठरतात. त्यांनी शिक्षणाची गंगा सामान्य माणसाच्या झोपडीत नेऊन दिली.'' कार्यक्रमात विद्यालयातील सर्व शिक्षकांना गुलाब पुष्प व लेखणी देऊन विद्यार्थ्यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिक्षकवृंदांना गौरवण्यात आले. वद्यार्थ्यांनीही या प्रसंगी आपले अभिव्यक्तीतून गुरूंचा गौरव केला.कार्तिक जगताप, मयूर पेडगावकर आणि आदर्श मुंडे यांनी प्रभावी भाषणे केली. संकेत दरेकर व अथर्व गोसावी यांनी भावगीत गात कार्यक्रमात रंग भरला.कवी कृष्णा मुळे यांनी गुरू व आईच्या महत्त्वावर आधारित कविता सादर केली. कार्यक्रमाच्या मंचावर रयत शिक्षण संस्थेचे चार्टर्ड अकाउंटंट प्रशांत साळुंखे, ॲड. कुटे, प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनीता काकडे, ज्येष्ठ शिक्षक विलास दरेकर, सुधीर साबळे आणि संपूर्ण शिक्षकवृंद उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौरव भोळे यांनी केले. सूत्रसंचालन आदित्य डेबरे यांनी तर आभारप्रदर्शन उपप्राचार्य शहाजी एकाड यांनी केले.या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन दहावी ड व वर्गशिक्षक बापू जाधव आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख कैलास उकिरडे यांनी केले.